# आई भगवतीचे दर्शन व पूर्ण आशिर्वाद कसा प्राप्त करावा?



शिवतीर्थ



हनुमान मंदिर



अर्धनारी नटेश्वर



महिषासुर (म्हसोबा महाराज)



श्री गणेश मंदिर



श्री राम मंदिर

सध्याच्या धावपळीच्या जीवनात आपण सर्व खूप व्यस्त झालो आहोत. या व्यस्त जीवनात आपण सारेजण जीवनाच्या सगळ्याच बाबतीत पळवाटा शोधत असतो. तेच आपण देवदर्शनच्या बाबतीतही करत असतो. भाविक घरातून देवदर्शनासाठी निघतात तर खरे पण परतीची खूप घाई झालेली असते. घाईघाईत किंवा जसे होईल तसे दर्शन करुन निघतो. कुणीतरी वडीलधाऱ्यांनी सांगितले म्हणून किंवा एक मनावर ओझं नको म्हणून औपचारिकता म्हणून दरवर्षी दर्शन घेतो. परंतु या सर्वात आपण काही गोष्टी विसरतो आणि कालांतराने आपल्याला पूजेचे फळ प्राप्त झाले नाही म्हणून देवाला दोष देतो.

आई भगवतीचा संपूर्ण आशिर्वाद प्राप्त होण्यासाठी दर्शन कसे घ्यावे याविषयी काही जुन्या लोकांच्या किंवा आईच्या भक्तांनुसार, आई भगवतीच्या दर्शनाला जाताना **नीटनेटका ड्रेस/पोशाख परिधान करावा.** आई भगवतीच्या दर्शनाला जाताना शालीनतेने जावे. सर्व प्रथम सप्तशृंग गडावर आल्यावर **शिवतीर्थावर येऊन शुचिर्भूत व्हावे** व शिवतीर्थाभोवती एक परिक्रमा करावी नंतर बाजूलाच असलेल्या **हनुमंताचे दर्शन** घेऊन पुढे **अर्धनारी नटेश्वर भगवान शिवाचे दर्शन** घेऊन गडाकडे प्रस्थान करावे. गडाच्या पायथ्याशी येऊन सर्वप्रथम **महिषासुर महाराजांचे दर्शन** घ्यावे. (महिषासुर महाराज म्हणजेच म्हसोबा महाराज ज्यांना आई भगवतीने वध केला त्यावेळी उ:शाप दिला होता कि, आधी भक्त तुला प्रणाम करतील मगच माझ्यापर्यंत येतील) पहिल्या पायरीच्या आधी **दक्षिणाभिमुख गणेश मंदिर** असून त्याला वंदन करून गड चढण्यास सुरुवात करावी.

पहिल्या पायरीपासून श्री भगवतीची मनात प्रार्थना करुन **'ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुण्डायै विच्चे'** हा नवार्णव मंत्र किंवा **'जय माता दी'** किंवा **'बोल अंबे की जय'** असा जयघोष करावा. काही पायऱ्या वर चढून गेल्यावर राम टप्पा लागतो. त्या ठिकाणी **प्रभू श्रीरामचंद्रांचे मंदिर** लागेल. (पंचवटीत असताना प्रभू श्रीराम आई सप्तश्रृंगीच्या दर्शनास येत असत.) तेथे प्रभू श्रीरामांचे दर्शन घेऊन पुढील वाटचाल करावी.


कासव टप्पा


श्री दत्तात्रय मंदिर


आई सप्तशृंगी


कालभैरव महाराज


परशुराम बाला

पुढे गेल्यावर **राधाकृष्ण मंदिर** व **कासव टप्पा** लागतो. म्हणजेच कासवाची मूर्ती लागेल. तिचे दर्शन घ्यावे. याचा अर्थ असा होतो की, कासवाच्या गतीने कोणतीही घाईगडबड न करता संथगतीने /लीनतेने आपण आई जगदंबेच्या दर्शनासाठी गडावर जावे.पुढे **श्री दत्त महाराजांचे मंदिर लागते.** त्या ठिकाणी श्री दत्त महाराजांचे मनोभावे दर्शन घ्यावे. तसेच बाजूला असलेल्या **नवनाथांच्या प्रतिमेला** देखील दंडवत घालावा. (आई सप्तशृंगी नाथ भक्तांची कुलस्वामिनी आहे. तिच्याच कृपेने नवनाथांना शाबरी विद्या प्राप्त झाली) श्री भगवतीच्या गाभाऱ्यात पोहचल्यावर **आई सप्तशृंगीचे दर्शन थेट डोळ्यात डोळे घालून दर्शन न घेता** सर्वप्रथम आई जगदंबेच्या पायापासून दर्शन घेण्यास सुरुवात करावी. मग हळुवारपणे मुखदर्शन करावे. याला विनम्रता असे म्हणतात. जगदंबेचे दर्शन झाल्यावर भगवान शिवशंकराचे मनातून स्मरण करावे. असे केल्याने ती जगदंबा खुश होते. जगदंबेचे संपूर्ण रुप डोळ्यात साठवल्यानंतर बाहेर आईचे वाहन असलेल्या सिंह महाराजांचे दर्शन घ्यावे (काही भाविक आपली मनातील इच्छा सिंहाच्या कानात सांगतात.)

मग परतीच्या वाटेला जाताना डाव्या बाजूस आई जगदंबेचे रक्षक **कालभैरव महाराजांचे** छोटेसे मंदिर लागते. कालभैरव महाराजांचे दर्शन घेणे खूप महत्वाचे असते. त्याशिवाय पूर्ण यात्रा / पूर्णतीर्थ प्राप्त होत नाही. तसेच काही भाविक गडाच्या मागील बाजूस **परशुराम बाला (म्हणजेच भगवान परशुराम)** यांचे दर्शन घेण्यासाठी जातात. **मात्र काही कारणास्तव शासनाने परशुराम बाळा मार्ग दर्शनासाठी बंद केला आहे. त्यामुळे भाविकांनी श्री परशुराम बाळा यांचे मनात स्मरण करुन दर्शन घ्यावे.** परशुराम बाला म्हणजे आई भगवतीचे पुत्र. सर्व दर्शन घेताना वरील सांगिल्याप्रमाणे मंत्र घोष चालू ठेवावा. त्यानंतर गडाखाली उतरुन पुन्हा एकदा आई जगदंबेला नमस्कार करुन **"तुझा आशिर्वाद सदैव आम्हां सर्वांवर राहू दे"** असे साकडे घालावे. असा सर्वांचा आशिर्वाद घेतल्यावरच संपूर्ण तीर्थयात्रेचे पुण्यफल प्राप्त होते.

**महिषासुराचा वध केला म्हणून आई सप्तश्रृंगीला महिषासुरमर्दिनी असेही म्हटले जाते.**

## आई भगवतीचे थेट दर्शन घेण्यासाठी खालील बटनावर क्लिक करा.

**LIVE DARSHAN**

Follow Us:

Copyright @ www.ssndtonline.org

देणगी

# एक देणगी श्री सप्तशृंगी निवासिनी देवी चरणी अर्पण

**आई भगवतीच्या चरणी दान अर्पण करण्यासाठी खाली दिलेल्या QR कोडला स्कॅन करा किंवा SBI Portal / Online Website Payment लिंक्सवर क्लिक करा:**

Scan and Pay with any BHIM UPI app

PhonePe | Whatsapp | Freecharge | Google Pay | Paytm

HDFC bank | SBI pay | ICICI Bank | Axis pay | My airtel

Q577708486@ybl

**SHREE SAPTASHRUN NIWASINI DEVI TRUST**

Payment Via
**SBI Portal**
PAY NOW

Payment Via
**Online Website Portal**
PAY NOW

**आई भगवतीच्या चरणी कमीत कमी रुपये १०१/- पासून सुरुवात करून आपण देणगी देऊ शकता.**

**टीप: देणगी देऊन आपण 80G अंतर्गत Income Tax मध्ये सवलत घेऊ शकता.**
**80G बद्दल अधिक माहितीसाठी पुढील पेजवर जा**

Follow Us:

Visit: www.ssndtonline.org | Call: (02592) 253351 / 253249

# निधीचा तपशील

| अ.नं. | निधी | Funds |
|---|---|---|
| १ | मंदिर जीर्णोद्धार निधी | Temple Restoration Fund |
| २ | इमारत निधी | Building Funds |
| ३ | मेडिकल निधी | Medical Funds |
| ४ | जीवनदान निधी | Life Base Support Fund |
| ५ | इतर निधी | Other Fund |

# देणगीचा तपशील

| अ.नं. | निधी | देणगी (₹) | Funds |
|---|---|---|---|
| १ | अन्नदान देणगी | - | Annadaan Donation |
| २ | इतर पूजा देणगी | - | Other Pooja Donations |
| ३ | **पंचामृत अभिषेक देणगी** | **₹ ३,१००/-** | Panchamrut Abhishek Donation |
| ४ | नंदादीप (तेल) देणगी (१५ दिवस) | ₹ ७०१/- | Nandadeep (Oil) Donation (15 Day) |
| ५ | नंदादीप (तेल) देणगी (८ दिवस) | ₹ ५०१/- | Nandadeep (Oil) Donation (8 Day) |
| ६ | नंदादीप (तेल) देणगी (१ दिवस) | ₹ १०१/- | Nandadeep (Oil) Donation (1 Day) |
| ७ | **नंदादीप (तुप) देणगी (८ दिवस)** | **₹ ५०१/-** | Nandadeep (Ghee) Donation (8 Day) |
| ८ | दुग्ध अभिषेक देणगी | ₹ ३५१/- | Dugdh Abhishek Donation |
| ९ | ओटी पूजा साहित्य देणगी | ₹ ३०१/- | Outi Pooja Sahitya Donation |
| १० | संपुष्टीत पाठ्पुजा | ₹ ४०१/- | Sampushtit Pathpooja Donation |
| ११ | पल्लव पाठ पूजा देणगी | ₹ ३०१/- | Pallav Pathpooja Donation |
| १२ | सप्तशती पाठपूजा देणगी | ₹ २०१/- | Saptashati Pathpooja Donation |
| १३ | अभिषेक देणगी | ₹ १५१/- | Abhishek Donation |
| १४ | महानैवेद्य देणगी | ₹ १५१/- | Mahanaivedya Donation |

**Note: 80G Receipts is not available for religious objects like Pooja, Mahapooja or Abhishek**